# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १९२ वा गुरूवार दि.२८ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मुस्लिम लीग जम्मू-काश्मीर संघटनेवरवर बंदी



नवी दिल्ली : केंद्र सरकारने बुधवारी (२७ डिसेंबर) मुस्लिम लीग जम्मू-काश्मीरवर (मसरत आलम गट) (एमएलजेके-एमए) बंदी घातली. सरकारने ही कारवाई बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंध कायदा (युएपीए) अंतर्गत केली आहे. संघटनेचे सदस्य जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होते आणि दहशतवादी गटांना पाठिंबा देत असल्याचा आरोप या संघटनेवर आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही माहिती दिली आहे.ते म्हणाले की, ही संघटना आणि तिचे सदस्य जम्मू आणि काश्मीरमध्ये देशविरोधी आणि फुटीरतावादी कारवायांमध्ये गुंतलेले आहेत, दहशतवादी कारवायांचे समर्थन करतात आणि लोकांना जम्मू आणि काश्मीरमध्ये इस्लामिक राज्य स्थापन करण्यासाठी प्रवृत्त करतात. गृहमंत्री पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचा संदेश स्पष्ट आहे. आपल्या देशाची एकता, सार्वभौमत्व आणि अखंडतेच्या विरोधात काम करणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही आणि कायद्याच्या रोषाला सामोरे जावे लागेल.मसरत आलम हा २०१० मध्ये खोऱ्यात झालेल्या स्वातंत्र्य समर्थक आंदोलनाच्या मुख्य संयोजकांपैकी एक होता. त्या काळात झालेल्या निदर्शनांनंतर आलमला इतर अनेक नेत्यांसह अटक करण्यात आली आणि २०१५ मध्ये मेहबूबा मुफ्ती सरकार सत्तेवर आल्यावर त्याची सुटका करण्यात आली.

## आरबीआय कार्यालयाला धमकीचा ईमेल पाठवणाऱ्याला अटक

मुंबई : मुंबईतील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा ईमेल पाठवण्यात आला होता. याप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने ईमेल पाठवणाऱ्या व्यक्तीला अटक केली आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेने धमकीचा ईमेल पाठवणाऱ्या व्यक्तीसह अन्य दोन जणांना अटक केली आहे. मुंबई क्राईम ब्रँचने या व्यक्तीला गुजरातमधील वडोदरा शहरातून अटक केली. आरोपी व्यक्ती दारूच्या नशेत नव्हता. त्याने हा ईमेल का पाठवला याची माहिती गुन्हे शाखा गोळा करत आहे.आरोपीने मंगळवारी पाठवलेल्या मेलमध्ये आरबीआय कार्यालय, एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेला बॉम्बने उडवण्याची धमकी दिली होती.




## फेब्रुवारीपासून फडणवीसांच्या प्रचाराचा धडाका

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने विशेष रणनीती आखली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४५हून अधिक जागा जिंकण्याचा निर्धार भाजपने केला आहे. त्याअंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचाराचा धडाका उडवून देणार आहेत. फडणवीस राज्यभर मॅरेथॉन दौरा करणार आहेत.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचाराच्या मैदानात उतरणार असून ते फेब्रुवारीपासून दररोज ३ सभा घेणार आहेत. लवकरच या दौ-याचे वेळापत्रक जाहीर होईल. महायुतीच्या आमदार आणि खासदारांसोबत फडणवीस प्रचार करणार आहेत. केंद्रात नरेंद्र मोदींना तिस-यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून उत्तर प्रदेशनंतर मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रावर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे.महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. त्यापैकी महायुतीने ४५ पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपने फेब्रुवारीपासून राज्यात प्रचाराचा धडाका लावण्याचे निश्चित केले आहे. राज्यातील भाजपचा चेहरा असलेले देवेंद्र फडणवीस या निमित्ताने राज्य पिंजून काढणार आहेत.



## तेलंगणात सहा हमी लागू करण्याची राज्य सरकारची घोषणा

हैदराबाद : तेलंगणात पहिल्यांदाच सरकार स्थापन करणाऱ्या काँग्रेस सरकारने पक्षाने सहा हमी लागू करण्याची घोषणा केली आहे. निवडणूक आश्वासनाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने प्रजा पालन अर्जाचा फॉर्म सुरू केला आहे. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि उपमुख्यमंत्री भट्टी विकरमार्क यांनी बुधवारी काँग्रेसच्या सहा हमीभावांच्या अंमलबजावणीसाठी प्रजा पालन अर्जाचा शुभारंभ केला. कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री रेवंत रेड्डी म्हणाले, 'काँग्रेस तेलंगणातील लोकांना अभय हस्तम म्हणजेच सहा हमीपत्र देत आहे. सरकारच्या धोरणात जनता प्रथम येते. सरकारने जनतेत जायला हवे, असे ते म्हणाले.ते म्हणाले की, काँग्रेस सरकार संपूर्ण राज्यातील गावे, नगरपालिका प्रभाग आणि जिल्ह्यांमध्ये प्रजा पालनाचे आयोजन करणार आहे. सर्व लोकांना मदत करणे हे आमचे ध्येय आहे. प्रजा भवन येथे २० हजारांहून अधिक अर्ज देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. लोकांचे बहुतांश प्रश्न जमिनीशी संबंधित आहेत. त्यामुळे सरकारने लोकांमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांना सरकारकडे जावे लागते, ही स्थिती चांगली नाही. आता सरकारने लोकांकडे जावे, असे त्यांनी म्हटले.काँग्रेसने महालक्ष्मी योजनेंतर्गत महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. याशिवाय घरगुती गॅस सिलिंडरही ५०० रुपयांना मिळणार आहे. महिलांना राज्य सरकारच्या बसमधून मोफत प्रवास दिला जात आहे. याशिवाय काँग्रेस पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यात आणखी पाच हमी देण्याचे आश्वासन दिले होते. शेतकऱ्यांसाठी रायथू ट्रस्ट, गरिबांना घर देण्यासाठी इंदिराम्मा योजना, वीज बिल अनुदानासाठी गृह ज्योती योजना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी युवा विकास योजना, आरोग्य विम्यासाठी चेयुथा योजना आणि रुग्ण आणि ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे.



## रक्षणासोबतच देशवासीयांची मने जिंकण्याचीही लष्करावर जबाबदारी

नवी दिल्ली : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह जम्मू दौऱ्यावर आहेत. पूंछमध्ये लष्कराच्या वाहनांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात चार जवान शहीद झाल्यानंतर काही दिवसांनी संरक्षणमंत्र्यांचा हा दौरा केला आहे. सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी जम्मूमध्ये पोहोचलेले संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तात्काळ राजौरीला रवाना झाले. या दौऱ्यात राजनाथ सिंह यांनी सैनिकांची भेट घेतल्यानंतर त्यांना संबोधित केले. राजनाथ सिंह म्हणाले की, देशाच्या रक्षणासोबतच देशवासीयांची मने जिंकण्याचीही जबाबदारी लष्करावर आहे. त्यांनी म्हटले आहे की, त्यांना माहित आहे की सैनिक असे करण्याचा प्रयत्न करतात, परंतु काहीवेळा चूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा चुका होणार नाहीत, ज्यामुळे कोणत्याही भारतीयाला दुखापत होईल, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. राजनाथ सिंह म्हणाले, तुम्ही ज्या देशाची सेवा करता त्या देशातील लोकांशी सक्रियपणे गुंतून राहा. तुम्ही त्यांचा विश्वास संपादन करा, तुम्ही त्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकता आणि तुम्ही ते करू शकता. पण ते अधिक गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वेळोवेळी त्यांच्यामध्ये जाऊन देशवासीयांचे हित विचारणे, काही अडचण असल्यास, त्याची माहिती घेणे, ही सर्व जबाबदारी तुमचीही आहे, असे मला वाटते, असे ते म्हणाले.

राजनाथ सिंह यांचे हे विधान महत्त्वाचे मानले जात आहे कारण गेल्या आठवड्यात पुंछ-राजौरीमध्ये लष्करावर झालेल्या हल्ल्यानंतर लष्कराने आठ जणांना चौकशीसाठी बोलावले होते. त्यानंतर तिघांचे मृतदेह सापडले. या घटनेनंतर लोकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तिकडे दौऱ्यावर आहेत. तसेच लष्करावर झालेल्या हल्ल्यात चार जवानही शहीद झाले आहेत.



## राज्य पत्रकार संघाच्या डिजिटल मीडीया प्रदेशाध्यक्ष पदी सिद्धार्थ भोकरे यांची निवड



पुणे : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या डिजिटल मिडियाचे प्रदेश अध्यक्ष म्हणून सिध्दार्थ भोकरे यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला तसेच निवडीचे पत्र देऊन उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी सत्कार केला. यावेळी प्रदेश संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष किरण जोशी व विविध वृत्तपत्रांचे संपादक, पत्रकार उपस्थित होते. आगामी काळात डिजिटल मिडियामार्फत राज्यातील पत्रकारांसाठी विविध योजना राबवून जनतेला सर्वस्तरातील बातम्या अतिजलदगतीने देण्याचा मानस असल्याचे यावेळी सिध्दार्थ भोकरे यांनी सांगितले.

## भजनलाल शर्मा यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार रखडला

जयपूर : राजस्थानमध्ये मंत्रिमंडळ स्थापनेच्या प्रतिक्षेचा नवा विक्रम प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन भजनलाल शर्मा यांना तब्बल २५ दिवस दिवस झाले आहेत. पण अजूनही मंत्रिमंडळ विस्ताराची स्थिती स्पष्ट झालेली नाही. मुख्यमंत्र्यांकडे सर्व ४५ विभागांची जबाबदारी आहे. दोन उपमुख्यमंत्री शपथ घेतल्यानंतरही ते खात्याशिवाय आहेत. भजनलाल शर्मा यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार २५ दिवसांपासून रखडला आहे.



## संपादकीय....

# काश्मीरच्या कळा

पूंछ-राजौरी विभागात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय सैन्यदलाच्या वाहनावर हल्ला केला. त्यात एकूण चार जवान हुतात्मा झाले. या हल्ल्याचा तपास चालू असताना भारतीय लष्कराने ज्या स्थानिक नागरिकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले, त्यातील तिघांचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण गंभीर बनले.जम्मू-काश्मीर पूर्ण शांत होऊन भारतीय संघराज्यात पुरते मिळून-मिसळून जाण्याची वाटचाल किती गुंतागुंतीची आणि दीर्घकाळ चालणारी आहे; याचा अंदाज सध्याच्या घडामोडींवरून यावा. पाकिस्तानात प्रशिक्षण मिळून भारतात शिरणाऱ्या दहशतवाद्यांनी आता काश्मीरऐवजी जम्मू विभागाला लक्ष्य केले आहे. पूंछ-राजौरी विभागात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय सैन्यदलाच्या वाहनावर हल्ला केला. त्यात एकूण चार जवान हुतात्मा झाले. या हल्ल्याचा तपास चालू असताना भारतीय लष्कराने ज्या स्थानिक नागरिकांना चौकशीसाठी ताब्यात घेतले, त्यातील तिघांचा मृत्यू झाल्याने हे प्रकरण गंभीर बनले. लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे तिथे धावून गेले. या प्रकरणाची रीतसर चौकशी होईल, असे आश्वासन त्यांनी दिले. एका ब्रिगेडियरला तूर्त दूर करण्यात आले आहे. आज-बुधवारी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह श्रीनगरमध्ये उच्चस्तरीय बैठक घेत आहेत. जम्मू-काश्मीर प्रशासनाने मृतांच्या नातलगांना भरपाई आणि त्यांच्या स्तरावर चौकशी सुरू केली आहे. थोडक्यात, या दुर्घटनेचे गांभीर्य केंद्र, राज्य आणि संरक्षण दले या तिघांनाही चटकन समजले. राज्यघटनेतील ३७० कलम काढून टाकल्यानंतर सुरू झालेला जम्मू आणि काश्मीरचा नवा प्रवास अवरुद्ध करण्याची ताकद या दुर्घटनेत आहे. नागरिकांची चौकशी करताना त्यांचा इतका छळ होणे, मुळीच क्षम्य नाही. तसे झाले तर दहशतवादी आणि सैन्यदले यांच्यात फरक तो काय राहिला? केंद्र सरकारला हडेलहप्पी न करता पूर्णपणे पारदर्शकता राखून या प्रकरणाची चौकशी होऊ द्यावी लागेल. जे दोषी ठरतील, त्यांना शिक्षा व्हावी लागेल. अशा शिक्षा या आधीही झाल्या आहेत. तसेच आत्ता व्हावे लागेल. लष्कर, निमलष्करी दले, काश्मीर पोलिस हे सारे अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत काम करीत आहेत. राजौरी-पूंछ भागात स्थानिकांनी आश्रय दिल्याशिवाय दहशतवादी दबा धरू शकत नाहीत, हे खरे आहे. मात्र, स्थानिक रहिवाशांची दोन्ही बाजूंनी कोंडी होते. नक्षलग्रस्त भागात हे अनेकदा दिसते. लष्कराने ताब्यात घेतलेले नागरिक गुज्जर बकरवाल समाजाचे आहेत. हा समाज कायमच कट्टर देशभक्त राहिला आहे. कारगिलमधील पाकिस्तानी घुसखोरी या समाजाच्या पशुपालकांनीच प्रथम ओळखली, हे विसरून चालणार नाही. त्यांनीच लष्कराला सावधही केले. काही महिन्यांपूर्वी या समाजाने काश्मिरात आरक्षण मिळू शकणाऱ्या समाजांच्या नव्या अनुसूचीला विरोध केला. मोर्चे काढले. काही पहाडी जमातींमुळे आपल्याला मिळणारा सवलतींचा घास हिरावला जाईल, अशी भीती गुज्जरांना वाटते. हा गुंता सरकारला आस्थेने सोडवावा लागेल. या नाराजीला भलते वळण लागणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. त्यांना दहशतवाद्यांबद्दल सहानुभूती वाटायला नको. आता काश्मिरात दहशतवादी अत्याधुनिक चिनी बनावटीची शस्त्रे वापरत आहेत. ती भारतीय लष्कराच्या तोडीस तोड आहेत. मुळात ती पाकिस्तानी लष्कराला मिळाली असणार. देशांतर्गत प्रश्नांनी पाकिस्तान धडधडून पेटला असला, तरी आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कर काश्मीर पेटवण्याची कारस्थाने थांबवायला तयार नाहीत.आधी लष्करावरचा हल्ला आणि त्यानंतरचे हे मृत्यू झाल्यानंतर 'भारत आणि पाकिस्तान यांनी चर्चा केली नाही तर काश्मीरची एक दिवस 'गाझा पट्टी' होईल,' अशी 'शापवाणी' माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी उच्चारली आहे. अब्दुल्ला यांची ही भूमिका आगीत तेल ओतणारी आहे. ते हेच करीत आले आहेत. आज भारत सरकार आपल्या बाजूच्या काश्मीरची सर्वांगीण प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहे. तिथे नवे उद्योग येत आहेत. पर्यटन विक्रमी वेगाने वाढत आहे. उलटपक्षी, पाकव्याप्त काश्मीरमध्ये गरिबीने, उपासमारीने कहर चालविला आहे. अशा वेळी डॉ. अब्दुल्ला यांनी चार शब्द पाकला सुनावण्याची गरज होती. दहशतवादी येतच आहेत. त्यांना पाकिस्तानचा आश्रय स्पष्ट दिसतो आहे. त्यांच्याकडच्या चिनी शस्त्रास्त्रांनी आव्हान अधिक गंभीर होते आहे. जम्मू-काश्मीर शांत होताच कामा नये, असे पाकिस्तान व चीनलाही वाटते. अशा वेळी, भारत पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी केवळ घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना कंठस्नान घालणार की, पुन्हा सीमेच्या पलीकडे जाऊन कारवाई करणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पाकिस्तानला धडा शिकविणे, हा राजकीय निर्णय नाही. तसे त्याकडे पाहता कामा नये. परदेशी दहशतवाद्यांचा ओघ थांबवायचा असेल, तर कधीतरी मुळावर जबरदस्त घाव घालावाच लागेल. सध्या गिलगिट-बाल्टिस्तानचा भाग ५० वर्षांच्या कराराने चीनला देण्याचा प्रस्ताव चर्चेत आहे. तसे झालेच तर काश्मीर शांत होण्याची प्रक्रिया आणखी लांबत जाईल. ती लांबायची नसेल तर पाकचा काश्मीरमधील हस्तक्षेप पुरता संपवावा लागेल. लष्करी अधिकाऱ्यांनी संयमाने वागावे आणि नागरिकांचा छळ होता कामा नये, ही अपेक्षा जशी योग्य; तशीच आपले उमदे जवान आणि अधिकारी पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या हातातील चिनी शस्त्रांना बळी पडता कामा नयेत, ही अपेक्षाही चूक नाही. या दोन्ही आव्हानांचे खरे उत्तर एकच आहे.

# ओबीसीच्या भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी!.

ओबीसीच्या भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी आज संपुर्ण ओबीसी सुतार समाजाने संघटीत होणे गरजेचे आहे. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात ५० लाखाच्या जवळपास असल्याचे सोशल मीडियावर वाचण्यात आले आहे.राज्यातील ३६ जिल्ह्यातील जवळजवळ ३५० तालुक्यात विश्वकर्मीय सुतार समाज विस्तारित आहे आणि राज्यभरात विविध राज्यस्तरीय सामाजिक संघटना कार्यरत आहेत याच संघटनेच्या माध्यमातून समाजात विविध विकासात्मक आणि समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केले जातात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक संघटनेचे जबाबदार अध्यक्ष आणि विविध पातळीवर पदाधिकारी वर्गाची निवड करण्यात येते या मधूनच समाजात समाज नेतृत्व म्हणुन उदयास येत असते.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील स्वतः ला समाज नेतृत्व म्हणवुन घेणाऱ्या समाज नेत्यांनी तसेच पत्रकार,साहित्यिक,विचारवंतानी ओबीसी आरक्षण,ओबीसी जनगणना,सत्तेतील राजकीय हिस्सेदारीसाठी समाजात जाऊन प्रबोधन करणे गरजेचे आहे.ओबीसी कडे संपत्ती असेल आणि ज्ञान नसेल तर संपती काय कामाची असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही.भारतीय संविधान पाहिले नसेल तर वाचणार कधी म्हणूनच ओबीसी समाजात संविधान विषयी आवर्जुन राज्यभरात जनजागृती करणे अतिशय गरजेचे आणि आवश्यकता आहे. विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज हा संवैधानिक दृष्टीने ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक असतांना सुतार समाजात ओबीसी बद्दल समाज जागृती होतांना दिसत नाही.आज समाजात ज्या गोष्टींची गरज आहे त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि वधू वर सूचक मेळाव्यावर जास्त भर दिला जातो.साम ाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,कला,क्रिड ा कार्यक्रमाचे आयोजन केल्यास ओबीसी समाजातील तरुणांच्या कलाकौशल गुणवंता बाहेर काढण्यास संधी मिळेल.त्यामुळेच



ओळख नसलेला ओबीसी तरुण समाजात ओळख निर्माण करेल.त्यातून वधू वर संशोधनाची मोठी समस्या सुटू शकते. ओबीसी समाजात इतर छोटेमोठे कार्यक्रम राज्यभरात समाजात आयोजित केले जातात.त्यांचा राजकीय पक्षांना फायदा होतो. त्यातून कार्यकर्ता कार्यकर्ताच राहतो.तो ओबीसी समाजाचा नेता होऊ शकत आणि पक्षाचा पण नेता होऊ दिला जात नाही.प्रत्येक पक्षातील ओबीसी नेत्यांची यादी काढा त्यांच्या जातीत त्यांना किती मानले जाते ते तपासून पहा.ज्याला स्वतःच्या जातीत किंमत नाही त्याला ओबीसी नेता म्हणून मोठे केले जाते.म्हणूनच ओबीसी समाजाने हे समजून घेऊन बदलणे गरजेचे आहे.आता आज ओबीसीच्या कार्यकर्ता,नेता,पत्रकार,साहित्यिक,विचारवंत ानी स्वतःला बदलून घेतले नाही तर ओबीसीच्या भावी पिढीचे मोठे नुकसान झाल्या शिवाय राहणार नाही. राज्यात आणि देशात ओबीसी समाजातील विविध ओबीसी संघटना ओबीसी नेते, ओबीसी बहुजन समाजात जनजागृती अभियान राबवित आहेत.असे असताना ही विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाच्या संघटना,संस्था आणि जबाबदार पदाधिकारी, नेतेमंडळी वैचारिक दुष्ट्या दिशाहीन अवस्थेत वावरत आहेत.त्यांच्यामुळे ओबीसी समाजाच्या विविध पातळीवर कार्यरत पदाधिकारी मात्र ओबीसी बद्दल कोणताही ठोस कृती कार्यक्रम नसल्यामुळे गप्प बसून आहेत.त्यांच्या या वागण्यामुळे ओबीसीच्या येणाऱ्या भावी तरुण पिढीचे नुकसान होईल याचा विचार करण्याची जबाबदारी समाजातील नेत्यांची आहे.

ओबीसी समाजाची ५२ टक्के संख्या असतांना त्यांना कोणत्याही पक्षात मान्यताप्राप्त पद व निर्णय प्रक्रियेत स्थान नाही.आज नाही तर भविष्यात काय स्थान असेल याचा विचार करण्याची गरज आहे.ओबीसी समाजातील आजच्या पिढीला संविधान माहिती नसेल तर भावी पिढीला ते कोण सांगणार आहे.ओबीसी आरक्षण,जनगणना,राजकीय आरक्षण याबाबत कोणाचीच ठोस भूमिका नाही.सत्तेत सहभाग नाही,त्याबाबतचे ज्ञान नाही. त्यासाठी समाजात संघटना,संस्था पाहिजेत.संबंधित असलेले सर्वंच पदाधिकारी आणि स्वतःला समाज नेते म्हनवुन घेणाऱ्या अशा सर्वच समाज मान्यवरांनी समाजात ओबीसी बद्दल आणि इतर विषयावर प्रबोधन,जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचा आहे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सुतार समाज हा स्वतः ला सुशिक्षित उच्चवर्णीय समजतो.इथंच समाजात जागृतीचा मोठा अभाव जाणवतो,वास्तविक विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी समाज आहे. याचे भान सुद्धा नसावे याचे वाईट वाटते,सुतार समाजात आजही विश्वब्राह्मण म्हणजे उच्चवर्णीय समजतात आपण ओबीसी आहोत आणि ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहोत या बद्दल समाजात जबाबदारीने सांगण्यास कोणीही पुढाकार घेतांना दिसतं नाही त्यामुळे समाजात चुकीची माहिती पसरवली जाते आणि विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी समाजाचा एक मोठा ओबीसी घटक आहे.हे आजच्या तरुण पिढी पासून लपविले तर भविष्यात येणारी तरुण पिढी स्वतः ला काय म्हणून घेणार याचा गांभीर्याने जबाबदारीने विचार कोणी करतांना दिसत नाही. विश्वकर्मीय राज्यस्तरीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतानी हे अज्ञान दूर केले पाहिजे.अन्यथा काळ त्यांना कधीच माफ करणार नाही. वास्तविक पाहता समाजात अनेक जबाबदार मान्यताप्राप्त व्यक्ती आहेत त्यांची जबाबदारी आहे ती त्यांनी समाज जनजागृती वैचारिक प्रबोधन करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.परंतु,असे होतांना दिसत नाही याला समाजाचे भाग्य म्हणावे कि,दुर्भाग्य म्हणावे असा प्रश्न आजच्या तरुण पिढीला पडला पाहिजे.पण जिथे बापच जाग्यावर नाही तर पोर काय करतील.?विश्वकर्मीय सुतार सामाजिक क्षेत्रात अनेक संघटना आहेत अनेक सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत आणि त्या त्या सामाजिक संघटना संस्थेच्या कार्यकारिणी मध्ये सुशिक्षित उच्चशिक्षित,प्रतिष्ठित पदाधिकारी विराजमान आहेत.पण त्यांना स्वतःची कोणतीही विचारधारा नसेल तर ते वर्ण व्यवस्थे नुसार श्रद्धा,सबुरीने गुलामगिरीचं स्वीकारतील.पूर्व जन्माचे पाप आहे हे कुणालाच चुकले नाही हे त्यांच्या मेंदूत कायम बसले राहणार.विश्वकर्मीय समाज आजही कर्मकांड,धार्मिकता,काल्पनिक गोष्टींचा प्रचार व प्रसार करतांना दिसतो. समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकार केल्या शिवाय समाजात प्रगती होणार नाही याकडे समाजातील जबाबदार असणारे पदाधिकारी परखडपणे भाष्य करीत नाहीत.समाजात परखडपणे जनजागृती प्रबोधन करण्यास धजावत नसतील तर त्यांना विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंत म्हणताच येणार नाही.त्याचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक संघटना,संस्थेच्या कार्यकारिणीने समाजाला सत्य सांगितले तर समाज आपल्या पासुन दुर जाण्याची भिती सतावत असेल म्हणुन समाजात या बाबतीत जनजागृती प्रबोधन होत नाही. पर्यायाने समाजात अंधश्रद्धा आणि धार्मिकता बळावत जात आहे.आणि वैज्ञानिक दृष्टीकोन मागे पडत आहे हे कोणाच्याही लक्षात कसे येत नाही. हाच मोठा प्रश्न मला पडतो.विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतांना का पडत नाही.?

समाजात सुशिक्षित वर्गाचे प्रमाण जास्त आहे तरी सुद्धा समाजात अंधश्रद्धा आणि धार्मिकता दुर करण्यास अपयश का येते हा चिंतनाचा विषय आहे.असे मला वाटते विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक, विचारवंतांना काय वाटते माहिती नाही.मी वाचायला,बोलायला व लिहायला लागलो म्हणूनच समजायला लागलो.एकीकडे ओबीसी म्हणुन संवैधानिक दृष्टीने सर्वंच हक्क अधिकार मिळवायचे आणि दुसरीकडे ओबीसी बद्दल समाज प्रबोधनात्मक दृष्टीने मागे राहायचे असे दुटप्पी धोरणाचा अवलंब करायचा यामुळे समाजात वैचारिक आणि सामाजिक परिवर्तन होणार नाही.हे मला कळायला लागले.

ओबीसी बहुजन समाजासाठी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संवैधानिक दृष्टीने जनतेला अधिकार हक्काची जाणिव करून दिलेली असतांना त्याचा उपयोग समाजाला झाला पाहिजे यासाठी लढा उभारला पाहिजे विश्वकर्मीय सुतार समाजातील पत्रकार,साहित्यिक,विचारवंतां स्वतःला समाज नेतृत्व समजणाऱ्या नेत्यांना का वाटत नाही.आजची तरूण पिढी उद्याचे भविष्य आहे. असे केवळ बोलून चालणार नाही.तरूण पिढीला योग्य मार्गदर्शन आणि पर्याय दिला पाहिजे.तो मिळाला नाही तर मात्र तरूण पिढीचे भविष्यात वैचारिक नुकसान होईल याचा विचार करणे गरजेचे आहे.विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे समाजातील स्वतःला समाज नेतृत्व आणि जबाबदार व्यक्तिमत्त्व समजणाऱ्या प्रत्येक घटकांना याचा विसर पडु नये हि नैतिक जबाबदारी प्रत्येकांची आहे.म्हणूनच भावी पिढीचे नुकसान टाळण्यासाठी गरजेचे आहे.

जय संत भोजलिंग.जय ओबीसी,जय संविधान,

**********

**प्रमोद सुर्यवंशी,**
**८६०५५६९५२१**
**,चिखली मातृतीर्थ बुलडाणा.**

# एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.

कधी काळी भारत हा कृषिप्रधान देश होता.बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून कामधंदा,व्यवसाय व्यापार करायचे.त्यामुळेच एका कुटुंबाचा अनेक कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण होत होते.त्यातूनच सामाजिक बांधिलकी म्हणून एकमेकाची खूप इज्जत करायचे खानदानी नात्याला महत्व असायचे त्यामुळे कोणी ही कोणा बद्दल नकारात्मक विचार करतच नव्हते.कारण घरा घरात सकारात्मक विचारांचे संस्कार लहानपणापासून घरा घरात होत होते.म्हणूनच एकत्र कुटुंबात नातू पणतू झाले तरी कुटुंब एकत्र राहत होते. तेव्हा शिक्षणाला महत्व नव्हते संस्कार महत्वाचे होते. आणि ते पांच दहा मिनिटाच्या वागणुकीतून दिसून येत होते.हेच एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार प्रेरणादायी आणि लक्षवेधी होते.आज ते जवळ जवळ संपले.२०२३ मधून आपण २०२४ मध्ये प्रवेश करणार आहोत.देशात लोकशाही होती,आणि लोक काय म्हणतील ही भीती २०१९ पर्यन्त होती. कोरोनाने माणसांना माणसात आणले होते,देवाचे मंदिर बंद झाली होती. माणसांची सेवा करणारी दवाखाने चोवीस तास उघडे होती.देवाची किती ही आराधना केली तर तो धाऊन येत नव्हता पण मानसातील डॉक्टर देव चोवीस तास सेवा देण्यासाठी उपस्थित होता. तेव्हा ही सकारात्मक विचार आणि संस्कार असलेला माणूस सेवा देत होता.नकारात्मक विचार आणि संस्कार असलेला माणूस डॉक्टर पैसे कसे काढता येतील हाच विचार करीत होता. एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार यामुळेच पांच भाऊ तीन बहिणी लग्न झाल्यावर ही एकत्र कुटुंबात एकत्र स्वयंपाक करून एकत्र जेवत होते.पांच भावाच्या मुलामुलीचे लग्न होऊन त्यांना मुलमुली होऊन त्यांचे ही लग्न होऊन नात सुना घरात आल्यावर ही एकत्र कुटुंब गुण्यागोविंदाने राहत होते. वडिलधारयांचा योग्य तो मान सन्मान दिला जात होता.घरातील आर्थिक व्यवहार मोठा भाऊ सांभाळत होता, कोणी ही कधी कोणतीच तक्रार करीत नव्हता आणि त्यांच्या बायका कधीच आर्थिक व्यवहारात ढवळाढवल करून विचार पूस करीत नव्हत्या,एवढे महान संस्कार त्यांचावर झालेले असत.आज विभक्त कुटुंबात नकारात्मक विचार आणि संस्कार मिळत असल्यामुळे मुला-मुलींना शिक्षण खूप मिळते पण संस्कार कुठे ही दिसत नाही.आजची मुल शाळा महाविद्यालयातून पदव्या घेऊन बाहेर पडलेले आहेत. त्या पदव्या मुळे त्यांना चांगली नोकरी मिळते,त्यानंतर बायको.मग नवीन संसार सुरु होते. बायकोला स्वतचा टू बी एच के प्लॉट पाहिजे.एकत्र कुटुंबात तिला गुदमुदल्या सारखे होते.हा शिक्षण आणि संस्कार यातील फरक उघड होतो.मग सुरु होते महाभारत. दोन सुशिक्षित मुलाचे वडील स्वर्गवासी झाल्यामुळे सर्व संपती आईच्या नांवे असते.आईच्या नावे असलेली जागा आपल्या नावावर करून घेण्याची सुप्त इच्छा मनात धरून आईच्या ताब्यासाठी दोन भाऊ भांडत होते.आईला विचारल्यावर ती म्हणाली जो माझ्या तीन औषधाच्या गोळ्यांची नावे एका झटक्यात सांगेल त्याच्याकडे मी जाईन. दोन्ही भाऊ खजील झाले.हा एकत्र कुटुंबातील शिक्षण आणि संस्कार यातील फरक ठळकपणे आईने दाखवून दिला.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.शिक्षणासाठी दूर देशी गेलेल्या गरीब होतकरु मुलाने आईला पत्र पाठवले त्यात त्याने लिहिले,इथे माझी जेवणाची चंगळ आहे. काळजी करु नकोस. आईने ते पत्र वाचून एक वेळेचे जेवण सोडले कारण पत्राच्या शेवटी मुलाच्या अश्रुने शाई फुटली होती.मुलांला पत्र लिहून पाठवतांना जे लक्षात आले नाही,ते आईच्या कसे लक्षात आले.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार हा बदल दाखवून देतात. भारताच्या कृषिप्रधान देशातील अशिक्षित अडाणी शेतकरी शेतातून कोणी खाण्याचे फळ,शेंगा,आंबे चोरून खाल्ले तर भांडत नव्हता.तर विचारून मागितले असे तर दिले असते,चोरी करण्याची गरज काय होती असे बोलत होता.आताचा शेतकरी आंब्याच्या झाडावर चढून चोरुन आंबे काढणाऱ्या मुलांच्या पाठीत काठी घालून त्याला शिक्षा म्हणून किंवा थोडा वेळ धाक म्हणून त्यामुलांना झाडाला बांधून ठेवतो. त्यांची दखल निसर्ग घेतो आणि का कुणास ठाऊक पण त्यानंतर त्या झाडाला कधीच मोहर येतच नाही.निसर्ग ही शिक्षणातील व संस्कारातील फरक ओळखतो.

कृषिप्रधान देशातील शेतकरी शेतातून दमून घरी आला की आई बाबा आजीचे पाय चेपून देत होता.ते पाहूनच त्या शेतकऱ्याचा मुलगा शिक्षण घेऊन मोठा साहेब झाल.शहरात आला ऑफीसातून दमून घरी आल्यावर बाबाने आजीचे पाय चेपून दिल्याचे पाहून नातीने न सांगता बाबाच्या पाठीला तेल लावून दिल्याचे पाहून आजी म्हणाली, ताटातील वाटीत आणि वाटीतलं ताटात. हेच संस्कार एकत्र कुटुंबात लहानपणापासून होत असतात.तेच शेतकऱ्याची मुल शिक्षण घेऊन शहरात गेले की संस्कार विसरतात.मग त्यांची मुल त्यांना घरात ठेवत नाही तर वृद्धाश्रमात ठेवतात.हे आज खुलेआम केल्या जात आहे. कोणाची भितीच राहिली नाही.कारण एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार राहिलेच नाही.



उच्च शिक्षित मुलांनी वडील गेल्यावर भावांनी संपतीची वाटणी केली. म्हाता-या आईला आपल्या घरी नेताना बहीण म्हणाली,मी खुप भाग्यवान,माझ्या वाट्याला तर आयुष्य आलय.यातून आपण काय बोध घेणार आहोत?.एकाच घरात मुलगा आणि मुलगी लहानची मोठी होतात.शिक्षण आणि संस्कार घेतात मग हा फरक कसा पडतो?.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार मुलामुलीवर होत असतात. मुलमुली उच्च शिक्षण घेऊन मोठे झाले तरी घरातील संस्कार विसरत नाही.एक मुलगा आपल्या बाबांना म्हणतो बाबा मी तुला सोडून कधीच कुठे जाणार नाही कारण तू पण आजी आजोबांना सोडून कधीच कुठे गेला नाहीस. असे ऐकून कोणत्या बाबाला एकदम वडिलोपार्जित प्रॉपर्टी नावावर झाल्यासारखे फीलिंग आल्याशिवाय राहत नाही. एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार कसे असतात.त्या कुटुंबातील मुलमुली मोठी झाल्यावर कशी मदत करतात.एका मुलीच्या नवऱ्याचा मित्र भेटायला हॉस्पिटल मध्ये आला, तो खूपच आजारी होता म्हणून. जाताना मित्राच्या बायकोच्या हातात पाच हजार रुपयाचे पाकीट बळजबरीने कोंबून गेला. म्हणाला, लग्नात आहेर द्यायचाच राहिला होता. माझा दोस्त बरा झाला की छानसी साडी घ्या.त्या पाकिटा पुढे आज सारी प्रेझेंट्स फोल वाटली तिला.कारण हे संस्कार एकत्र कुटुंबात होतात. एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार महिला महिलांना कसे समजून घेतात. यावरच अवलंबून असतात.सध्या बाहेर इतके नकारात्मक विचार पेरले जातात की लोकांचा माणसातल्या चांगुलपणा वरचा विश्वास उडत चाललाय.अशावेळी अशा सकारात्मक विचारांच्या छोट्या छोट्या गोष्टी माणसांना खूप मोठी प्रेरणा देऊन जातात.सोशल मिडीयावर ह्या खूप येतात.त्या कोण किती गांभीर्याने घेतात हा त्यांचा त्यांचा प्रश्न आहे.पण मला त्या आवडतात मी मग त्यांचे असे संकलन करून ठेवतो.त्या सर्व एकत्र केल्या की असा प्रेरणादायी आणि लक्षवेधी लेख तयार होतो. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे प्रथम सासू सुना नंतर आजी आजोबा नांत जवळ जवळ संपले आहे.एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार हे आज कुठे ही फारसे दिसत नाही. स्मार्टपणा वाढत चालला त्यांना स्मार्ट फोन मोबाईलवर अर्धा एक तास बोलण्यासाठी वेळ आहे.समोर बसून कुटुंबातील व्यक्तीशी बोलण्यासाठी वेळ आणि विषयच नाही.हा प्रत्येक व्यक्तीच्या विचारातील सकारात्मक आणि नकारात्मक विचार आहे.जनावर एकत्र राहतात पण ते मुके प्राणी भावना समजून वागतात.आज माणसांना टू बी एच के,थ्री बी एच के मध्ये एकत्र राहून कोणाच्या कोणत्याही भावना समजत नाहीत. कारण काय?. तर एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार.लोकशाही संपल्यात जमा आहे. जागोजागी हुकुमशाही सुरू आहे त्या विरोधात बोलण्याची लिहण्याची किंमत मोजावी लागते.चार दिवसणे आपण नवीन वर्षात म्हणजे २०२४ मध्ये प्रवेश करणार आहोत. आपल्या समोर एकत्र कुटुंबाचे सकारात्मक विचार आणि संस्कार दिसत नाही तर विभक्त कुटुंबाचे नकारात्मक विचार आणि संस्कार राज्यावर आणि देशावर राज्य करतांना दिसतात.गेल्या वर्षभरात २०२३ ला आपण काय मिळविले आणि गमावले यांचा ताळेबंद आपणच मांडायचा आहे. पुढील २०२४ ला काय मिळवायचे आहे हे आताच ठरवा. घर,घरतील कुटुंब,सोसायटी मधील कुटुंबानी, गांव,तालुका,जिल्हा,राज्य आणि देशातील एकूण कुटुंबानी कोणत्या विचाराने संस्काराने जगायला पाहिजे सकारात्मक विचार आणि संस्कार.म्हणजेच लोकशाही. नकारात्मक विचार आणि संस्कार म्हणजेच हुकुमशाही कुटुंबातील एक छायाचित्र आणि देशातील एक छायाचित्र स्पष्टपणे दिसते.भविष्यात काय स्वीकारावे ?.

****************

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९**
**,भांडूप,मुंबई.**

# लोकशाहीच्या मंदिरातील 'घंटानाद'

संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला २२ वर्षे पूर्ण झाली त्याच दिवशी काही युवक थेट लोकसभेत पोहोचून अश्रुधूर पसरवतात, ही बाब जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणा-या भारतासाठी अत्यंत चिंताजनक आहे. संसदेची इमारत नवी बांधली; पण सुरक्षिततेबाबतच्या गहाळपणाची, ढिसाळपणाची मानसिकता जुनीच आहे, हे यातून स्पष्ट झाले. या घटनेला अनेक पैलू आहेत. निषेधाचा मार्ग म्हणून हे कृत्य केले असले तरी विविध भागातील हे तरुण-तरुणी एकत्र कसे आले? त्यांच्यावर कारवाई करताना त्यांना पास देणारे मोकाट का? या घटनेनंतर संसदेत दिसणारा सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष कितपत शोभनीय आहे. त्यामुळे केवळ संसद भवनाचे रक्षण केले पाहिजे असे नाही तर संसदीय लोकशाहीच्या भावनेचेही रक्षण केले पाहिजे.वीन संसद भवन या वास्तूला स्थापत्यकलेनुसार महत्त्व आहे त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे ते आपल्या लोकशाहीचे मंदिर आणि त्याचे प्रतीक आहे. त्याचे पावित्र्य जपणे ही सर्वांची जबाबदारी आहे. कारण संसद असेल तर लोकशाही असते; पण याच इमारतीत १३ डिसेंबरला दोन तरुणांनी प्रेक्षक गॅलरीतून लोकसभा सभागृहाच्या मध्यभागी उडी मारली आणि पकडले जाण्यापूर्वी ते आतल्या धुराच्या डब्यातून पिवळा धूर पसरवण्यात यशस्वी झाले. आणखी दोन साथीदार बाहेर पकडले गेले. हा धूर हानीकारक नव्हता, पण त्याऐवजी गनपावडर असती तर? त्याचदिवशी संसदेने २२ वर्षांपूर्वीच्या हल्ल्यात संसदेचे रक्षण करताना शहीद झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण केली होती आणि त्याच दिवशी खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू याने संसदेवर हल्ला करण्याची धमकी दिली होती; असे असूनही आमची सुरक्षा यंत्रणा गाफील असल्याचे दिसून आले. पण प्रश्न असा आहे की, 'सबकुछ चलता है' अशी संस्कृती आपल्याकडे का आहे, काही तरुणांनी १२०० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या नव्या संसद भवनाच्या सुरक्षेची चेष्टा का केली?नवीन भव्य इमारत पूर्णपणे सुरक्षित असेल असे सांगण्यात आले; पण काही महिन्यांतच आपण केवळ वास्तू बदलली, बेफिकिरीची मानसिकता नाही, हे लक्षात आले. यावेळी घुसखोरांचे दहशतवाद्यांशी संबंध नाहीत, की ते व्यावसायिक गुन्हेगार नाहीत, पण ते असते तर? आता आठ सुरक्षा कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले आहे; पण संसदेतील ४० टक्के सुरक्षा कर्मचा-यांच्या जागा रिक्त असल्याचेही समोर आले आहे. हे कसे घडले? नवीन इमारतीत प्रेक्षक गॅलरीतून खासदारांच्या वर पोहोचतात, तिथून उडी मारणे सोपे होते. जुन्या इमारतीत ते मागील बाजूस होते. ताज्या प्रकरणातील लोक त्यांच्या शूजमध्ये लपलेले धुराचे डबे घेऊन गेले आणि कोणतेही मशिन किंवा रक्षक त्यांना पकडू शकले नाहीत, हे आपल्या सुरक्षेचे वास्तव आहे.आता कदाचित प्रेक्षक गॅलरीसमोर आरसा बसवला जाईल जेणेकरून पुन्हा कोणी उडी मारू नये. डिझाईनमधील त्रुटीवर हा एकमेव इलाज आहे. संसद आणि खासदारांना सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व योग्य पावले उचलली जावीत पण याचा अर्थ असा होऊ नये की, जे त्याचे खरे मालक आहेत, त्यांच्या प्रवेशावर या निमित्ताने बंदी घालावी. आपल्या सभागृहाचे कामकाज कसे चालते, हे पाहण्याची संधी जनतेला मिळाली पाहिजे. जगातील अनेक संसदांमध्ये जनतेसाठी विशेष व्यवस्था केली जाते. कॅनडाची संसद उन्हाळ्यात लोकांसाठी आपले दरवाजे उघडते जेणेकरून लोक तिथल्या बागांमध्ये योगासने करू शकतील. जर्मन संसदेच्या इमारतीच्या बुंडेस्टॅगचा घुमट काचेचा बनवला आहे जेणेकरून लोकांना त्यांचे प्रतिनिधी काय करत आहेत हे वरून पाहता येईल. जगातील अनेक संसदेमध्ये प्रेक्षक गॅलरीतून पत्रिका फेकल्या गेल्याच्या घटना घडल्या आहेत. काच बसवल्यानंतर ही शक्यता संपुष्टात येईल पण संसदेचा पारदर्शकपणा मर्यादित राहू नये, हे ध्यानात घेतले पाहिजे. संसद ही केवळ लोकप्रतिनिधींची नसून लोकांचीही आहे. असे असताना या लोकांनी हे नाटक का रचले? केवळ निराशेपोटी त्यांना बेरोजगारीसारख्या मुद्यांकडे सरकारचे लक्ष वेधायचे होते की आणखी काही धोकादायक हेतू होते, हे केवळ तपासातूनच समजेल. परंतु हे सर्व तरुण देशाच्या विविध भागातील आहेत हे विशेष. काही उत्तर प्रदेशातील, काही बिहारमधील, काही कर्नाटकातील तर काही महाराष्ट्रातील आहेत. संसद भवनाबाहेर पकडलेली मुलगी नीलम सिंग ही हरियाणाची आहे. ती खूप शिकलेली आहे आणि लोकसेवा परीक्षेची तयारी करत होती तर उत्तर प्रदेशातील सागर शर्माने फक्त बारावीपर्यंतच शिक्षण घेतले आहे. ललित



झा हे बिहारचे शिक्षक आहेत. महाराष्ट्राचा अमोल धनराज शिंदे सैन्यात भरती होण्याच्या तयारीत होता, तर कर्नाटकच्या मनोरंजन देवराजे गौडा याने इंजिनीअरिंग केले आहे. एवढ्या वैविध्यपूर्ण आणि भिन्न पार्श्वभूमीचे हे तरुण एकत्र कसे आले? हे सर्वजण फेसबुकवर 'भगतसिंग फॅन क्लब'शी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. पंजाबमधील प्रत्येक सरकारी कार्यालयात त्यांचा फोटो लावला जातो. मुख्यमंत्री भगवंत मान पिवळी पगडी घालतात, पण भगतसिंग यांनी कधी पिवळी पगडी घातली असल्याचा कोणताही पुरावा नाही. नीलम सिंगने फेसबुकवर लिहिले आहे की, 'नव्या भारताच्या उभारणीसाठी भगतसिंगांच्या मार्गाचा अवलंब करा'.या पार्श्वभूमीवर भगतसिंग यांचे छायाचित्र लावण्यात आले होते. सागर शर्माने फेसबुकवर लिहिले आहे की, 'आज ज्या तरुणांना उद्या देशाची सूत्रे हाती घ्यायची आहेत, त्यांना अंध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.', पण हे लोक भगतसिंगांचे अनुयायी आहेत का? त्यांची विचारधारा यांना समजली आहे का? त्या महान हुतात्माने विधानसभेत बॉम्ब फेकताना म्हटले होते की, 'बहि-यांना ऐकू येण्यासाठी मोठा स्फोट लागतो', पण ते ज्या कानांबद्दल बोलत होते ते फिरंगी कान होते. असा प्रकार त्यांनी आपल्या संसदेत कधीच केला नसता. संसद भवनात किंवा अन्य कोठेही अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी हे कृत्य करणा-यांवर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. पण ज्या लोकप्रतिनिधीच्या बेजबाबदार वर्तनामुळे संसदेची सुरक्षा आणि प्रतिष्ठा धोक्यात आली आहे, त्या लोकप्रतिनिधींबाबत उदारता दाखवली जाऊ नये, हेही महत्त्वाचे आहे. या आरोपींना भाजपचे म्हैसूरचे खासदार प्रताप सिन्हा यांनी संसद प्रवेश पास दिला होता. त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे.एखाद्या खासदाराने प्रेक्षक पाससाठी फक्त तो ज्यांना वैयक्तिकरीत्या ओळखतो त्यांच्यासाठी अर्ज करावा. खासदाराने हे प्रमाणित केले पाहिजे की प्रेक्षक हा माझा नातेवाईक/वैयक्तिक मित्र/माझ्या वैयक्तिक ओळखीचा कोणीतरी आहे आणि मी त्याची जबाबदारी घेतो. प्रताप सिन्हा घडलेल्या प्रकाराच्या जबाबदारीतून सुटू शकत नाहीत, परंतु आजपर्यंत त्यांच्याविरुद्ध कोणताही तपास सुरू झाल्याची बातमी नाही.२२ वर्षांपूर्वी १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर हल्ला झाला होता. सध्याची घटना त्याहूनही गंभीर असल्याचे अनेकजण सांगत आहेत. कॅबिनेट सचिवालयातील माजी विशेष सचिव व्ही. बालचंद्रम लिहितात, यावेळी लोकसभेचे कामकाज सुरू असताना, गुन्हेगार संसदेच्या हृदयापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत. हे २००१ च्या घटनेपेक्षा अधिक गंभीर आहे, कारण तेव्हा दहशतवादी इमारतीच्या आत पोहोचण्यात यशस्वी झाले नाहीत. त्याच्यांकडे गॅसच्या डब्याऐवजी ग्रेनेड असते तर काय परिस्थिती असती? २००१ मध्ये पाकिस्तानात दहशतवादी हल्ला झाला होता. त्या दिवशी दहशतवादी पांढ-या रंगाच्या ॲम्बेसेडर कारमधून आले होते. कारमध्ये चालक आणि पाच दहशतवादी होते. या गोंधळात कार उपराष्ट्रपतींच्या गाडीला धडकली आणि सुरक्षा कर्मचारी सतर्क झाले हे सुदैव. दहशतवाद्यांनी संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला होता पण त्याआधी सीआरपीएफ कॉन्स्टेबल कमलेश कुमारी यांना मुख्य गेट बंद करण्यात यश आले होते. ते तिथेच शहीद झाले. त्यांना ११ गोळ्या लागल्या. या हल्ल्यात ९ जणांचा मृत्यू झाला होता. यावेळी असे काहीही झाले नाही, कोणत्याही प्रकारची हानी झाली नाही.या घटनांनंतर जे घडले ते पहिल्या घटनेपेक्षा खूप वेगळे होते.

## फिट व्हायचंय, पण व्यायामाचा कंटाळा; बेडवरच करा हे सोपे व्यायाम


जे सुट्टीच्या दिवशी सकाळी झोपेतून उठल्यावर बेडवरच करू शकता. त्यामुळे आता सुट्टीच्या दिवशीही तुमच्या व्यायामाला ब्रेक होणार नाही.सध्याच्या काळात फिटनेसला विशेष महत्त्व दिलं जातं. हृदयविकार, डायबेटिससारखे विकार होऊ नयेत, हे विकार झाले असतील तर ते नियंत्रणात राहावेत, लठ्ठपणा कमी व्हावा या उद्देशानं व्यायाम आणि योग्य आहारावर भर दिला जातो. वजन नियंत्रणासाठी आणि फिटनेससाठी जिममध्ये वर्कआउट करणं, धावणं, सायकलिंग, पोहणं आदी गोष्टी केल्या जातात. मात्र तुम्हालाही फिट व्हायचंय, पण व्यायामाचा कंटाळा येतो का? किंवा सुट्टीच्या दिवशी व्यायाम नकोसा वाटतो का? तर मग ही बातमी तुमच्यासाठी. आज आम्ही तुम्हाला असे व्यायाम सांगणार आहोत, जे सुट्टीच्या दिवशी सकाळी झोपेतून उठल्यावर बेडवरच करू शकता. त्यामुळे आता सुट्टीच्या दिवशीही तुमच्या व्यायामाला ब्रेक होणार नाही. आरोग्यतज्ज्ञ डॉ.



मिकी मेहता यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

## चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यासाठी तरुणाईने करावा आहारात 'या' पदार्थांचा समावेश; वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

बदलती जीवनशैली, सतत बसून काम करणे, शरीराची हालचाल न करणे किंवा व्यायामाच अभाव आणि कमी पौष्टिक आहार यामुळे शरीरात वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. याच कारणाने विशेषत: तरुणाईमध्ये रक्तवाहिन्यांसंबंधित आजार, मधुमेह आणि लठ्ठपणासारख्या समस्या वाढल्या आहेत. पुणे येथील सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ मिलोनी भंडारी सांगतात, द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.कोलेस्ट्रॉलचे मुख्य दोन प्रकार आहेत. एक चांगले कोलेस्ट्रॉल तर एक खराब कोलेस्ट्रॉल. खराब कोलेस्ट्रॉल शरीरासाठी हानिकारक असते, पण चांगले कोलेस्ट्रॉल हे रक्तातील कोलेस्ट्रॉल यकृताकडे नेण्यास मदत करते आणि शरीरातील अतिरिक्त कोलेस्ट्रॉल बाहेर काढण्यास मदत करते. हृदयविकार किंवा स्ट्रोकचा धोका टाळण्यासाठी शरीरात चांगल्या कोलेस्ट्रॉलची उच्च पातळी असणे आवश्यक आहे.बदलती जीवनशैली, सतत बसून काम करणे, शरीराची हालचाल न करणे किंवा व्यायामाच अभाव आणि कमी पौष्टिक आहार यामुळे शरीरात वाईट कोलेस्ट्रॉलची पातळी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. याच



कारणाने विशेषत: तरुणाईमध्ये रक्तवाहिन्यांसंबंधित आजार, मधुमेह आणि लठ्ठपणासारख्या समस्या वाढल्या आहेत. पुणे येथील सूर्या मदर अँड चाइल्ड सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ मिलोनी भंडारी सांगतात, द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.भंडारी सांगतात, चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्यासाठी फॅटी सिडयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. काजू, बिया, बिन्स आणि शेंगा आवर्जून खा. खनिजे आणि चांगले फॅट्सयुक्त पदार्थ खाणे यासाठी अधिक फायदेशीर ठरते. याशिवाय स्वयंपाक करताना ऑलिव्ह ऑइलचा वापर केल्यामुळे चांगले कोलेस्ट्रॉल वाढू शकते.दिल्ली येथील धरमशीला नारायणा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ पायल शर्मा सांगतात, बेरीज विशेषत: ब्लू बेरीजमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करतात.याशिवाय व्होकॅडो या फळामध्ये मोनो सॅच्युरेटेड फॅट्स असतात. हे फळ खाल्ल्याने चांगले कोलेस्ट्रॉल वाढण्यास मदत होते.सीफूड विशेषत: मासे, ज्यामध्ये ओमेगा ३ फॅटी सिडचा उत्तम स्त्रोत आहे, हे चांगले कोलेस्ट्रॉल वाढण्यास मदत करतात. आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करा; यामुळे शरीराला आवश्यक असलेले फायबर, खनिजे आणि जीवनसत्त्वे मिळतात, ज्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.शर्मा पुढे सांगतात, पालकासारख्या हिरव्या पालेभाज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर असतात, जे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करतात. लसणामध्येसुद्धा औषधी गुणधर्म आहे. हेसुद्धा खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास फायदेशीर ठरू शकते. सोयाबीनमध्ये कमी सॅच्युरेटेड फॅट्स असतात. भंडारी म्हणतात, नियमित सोयाबीनचे सेवन केल्याने शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. याशिवाय सुपरफूड म्हणून ओट्स आणि डार्क चॉकलेटसुद्धा खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. डॉ. पायल शर्मा सांगतात, समतोल आहार आणि नियमित व्यायाम हे कोलेस्ट्रॉलला नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. याशिवाय गरजेनुसार आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला घेणेही गरजेचे आहे.

# अजित दादांच्या आव्हानाचे माझ्यावर दडपण नाही

बारामती : अजित दादांच्या आव्हानाचे माझ्यावर दडपण नाही, असे वक्तव्य अमोल कोल्हे यांनी केले आहे. अमोल कोल्हे यांना पाडणार म्हणजे पाडणार, असे अजित पवार म्हणाले होते. याबाबत अमोल कोल्हे यांनी आज मत व्यक्त केले. अजित दादा स्वत:च्या गावासह मतदारसंघातील शेतक-यांचे प्रश्न सोडवू शकले नाहीत, असेही अमोल कोल्हे म्हणाले.किल्ले शिवनेरीपासून शेतकरी आक्रोश मोर्चा सुरू झाला. या मोर्चाचे नेतृत्व करणारे खासदार अमोल कोल्हे यांनी माझ्यावर अजित दादांच्या आव्हानाचे कोणतेही दडपण नाही, असे मोर्चाचा शुभारंभ करताच स्पष्ट केले. चार दिवसांचा मोर्चा उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या गावातून अन् बारामती या त्यांच्या बालेकिल्ल्यातून जाणार आहे. याद्वारे अजित पवार त्यांच्या मतदारसंघातील शेतक-यांचे प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरलेत, असा अप्रत्यक्ष टोला खासदार कोल्हे यांनी लगावला. अजित पवारांच्या बारामती मतदारसंघात त्यांच्या भगिनी सुप्रिया सुळेही या मोर्चाच्या केंद्रस्थानी असणार आहेत.२५ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ होऊ शकते तर खाणा-यांना रास्त किमतीत उपलब्ध करून त्यावर सबसिडी मिळावी.



शेतक-यांच्या प्रश्नावर आम्ही लढत आहोत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने याकडे लक्ष दिले पाहिजे. आढळराव गुडघ्याला बाशिंग लावून बसले आहेत. आढळराव यांना शुभेच्छा. ते एक वयस्कर नेते आहेत डिजिटल युगाची त्यांना ज्ञात नसावी. कांदा निर्यात बंदी उठवावी अशी आमची साधी मागणी आहे. निवडणूक हा गौण भाग आहे, मिळणा-या पदाला काय चाटायचे आहे का? आमच्यासाठी शेतक-यांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत, असे अमोल कोल्हे म्हणाले.अजित पवार हे मोठे नेते आहेत. त्यांच्याविषयी मी बोलणार नाही. ही यात्रा सर्वसामान्य आणि शेतक-यांच्या प्रश्नासंदर्भात आहे. कोणी हिला रोखू शकणार नाही, असेही अमोल कोल्हे म्हणाले.किती जणांचा कांदा खरेदी झाला? कांदा उत्पादक शेतक-यांना पैसे मिळायला लागले, तेव्हा कांदा निर्यात धोरण आणले. आपण रस्त्यावर उतरलो तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जपानमधून ट्विट केले, शेतक-यांचा कांदा नाफेडद्वारे खरेदी करणार. किती जणांचा कांदा खरेदी झाला, असा सवाल अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला.आता लढायचे, थांबायचे न्हाय दूध उत्पादक शेतक-यांची फसवणूक करतात. सरकारी दूध डेअरीमध्ये ५ टक्के अनुदान मात्र खाजगी दूध डेअरीमध्ये अनुदान नाही. असा भेदभाव का? २५ लाख कोटींचे कर्ज मोठ्या उद्योजकांचे माफ होते, पण शेतक-यांचे कर्ज माफ होत नाही. त्या शेतक-यांना आत्महत्या करावी लागत असेल तर सरकारला लाज वाटायला हवी. आता या मोर्चाबद्दल बोलतायेत. त्या मोठ्या व्यक्तींना काही वाटत असेल तर त्यांनी शेतक-यांचे हित जोपासावे. आता लढायचे, थांबायचे न्हाय, असे अमोल कोल्हे म्हणाले.

## 'भारत जोडो यात्रे'च्या धर्तीवर राहुल गांधींची 'भारत न्याय यात्रा'



नवी दिल्ली : आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्ष पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. भारत जोडो यात्रेच्या पहिल्या टप्प्यानंतर आता काँग्रेसकडून या यात्रेचा दुसरा टप्पा जाहीर करण्यात आला आहे. 'भारत जोडो यात्रे'च्या धर्तीवर राहुल गांधींची 'भारत न्याय यात्रा' निघणार आहे. यावेळी काँग्रेसच्या भारत न्याय यात्रेचा प्रवास मणिपूर ते मुंबई असा असणार असून ६२०० किलोमीटर अंतर यावेळी असणार आहे. काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी ही माहिती दिली आहे.काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून १४ जानेवारी २०२४ रोजी अर्थात मकरसंक्रांतीपासून या यात्रेला सुरुवात होणार आहे. जास्तीत जास्त लोकांना या यात्रेत सहभागी होता यावे यासाठी या यात्रेत बसचा वापर होणार आहे. तर पदयात्रेदरम्यान छोट्या-छोट्या अंतरासाठी चालण्याचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे, असे काँग्रेसकडून पत्रकार परिषदेत सांगण्यात आले आहे.राहुल गांधी यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये कन्याकुमारी येथून भारत जोडो यात्रेला सुरुवात केली होती. पाच महिन्यांच्या लाँग मार्चमध्ये हजारो काँग्रेस कार्यकर्ते तसेच विरोधी पक्षनेते सहभागी झाले होते. जानेवारीत श्रीनगरमध्ये या प्रवासाची सांगता झाली. भारत जोडो यात्रेचा काँग्रेसला कर्नाटक आणि तेलंगणात चांगला राजकीय फायदाही झाला आहे. या यात्रेमुळे कर्नाटक आणि तेलंगणाची सत्ता काँग्रेसला मिळाली होती. त्यामुळे आता दुसऱ्या टप्प्यातील यात्रेचा काँग्रेसला किती फायदा मिळतो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.१४ राज्यांमधून यात्रा जाणार या प्रवासात राहुल गांधी तरुण, महिला आणि समाजातील उपेक्षित लोकांची भेट घेणार आहेत. हा प्रवास ६,२०० किलोमीटरचा असणार असून मणिपूर, नागालँड, आसाम, मेघालय, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, यूपी, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या १४ राज्यांमधून यात्रा जाणार आहे.

## कांद्याच्या दरात घसरण

मनमाड : निर्यातबंदीच्या निर्णयानंतर कांदा दरात घसरण सुरूच आहे. गेल्या १५ दिवसांत कांद्याचे भाव क्विंटलमागे ११०० ते १२०० रुपयांपर्यंत घसरले आहेत. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात लाल कांद्याला सरासरी २७०० ते २८०० रुपये क्विंटल भाव होता. केंद्राने निर्यात बंदीचा निर्णय घेतला आणि तेव्हापासून बाजारात कांद्याचे भाव कोसळत आहेत. १००० ते १५०० रुपये दराने कांदा विकण्याची वेळ शेतक-यांवर आली आहे.१५ दिवसांत कांद्याचे दर निम्याहून अधिक कोसळल्याने शेतक-यांच्या आर्थिक अडचणीत कमालीची वाढ झाली आहे. मनमाड कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये लाल आणि पांढ-या कांद्याची २३४ नग इतकी आवक झाली. लाल कांद्याला ५०० ते १७११, सरासरी १५०० रुपये क्विंटल तर पांढ-या कांद्याला ४५२ ते ११००, सरासरी ९८० रुपये क्विंटल असा भाव होता. मक्याची ३२ नग आवक होऊन १९५१ ते २३११ सरासरी २०७५ रुपये प्रतिक्विंटल असे मक्याचे भाव होते. मका बाजारभाव सध्या स्थिर आहेत तर कांद्याचे भाव मात्र घसरणीला लागले आहेत. घाऊक बाजारात कांदा वधारल्याने शेतक-याची आशा पल्लवित झाली होती. पण निर्यातबंदी जाहीर झाली आणि कांद्याच्या भावाला ग्रहण लागले ते अद्यापपर्यंत कायम आहे.



त्यानंतर सातत्याने कांद्याचे भाव गडगडत आहेत. लासलगाव बाजार समितीत आठ हजार १९२ क्विंटल लाल कांद्याची आवक झाली. त्याला सरासरी दीड हजार रुपये दर मिळाला. आदल्या दिवशीच्या तुलनेत १०० रुपयांनी दर कमी झाले. अनेक बाजार समित्यांमध्ये उन्हाळ कांद्याची आवक जवळपास थांबली आहे. आता नवीन लाल कांदा बाजारात येत आहे. या कांद्याची साठवणूक करता येत नाही. तो काढणीनंतर लवकर विक्रीस न्यावा लागतो. त्यामुळे दर घसरलेले असतानाही तो विकण्याशिवाय पर्याय नसल्याचे शेतकरी सांगतात.

# बौध्द धम्म परिषदेत घेतली मातंग समाज बांधवांनी घेतली बौद्ध धम्मदीक्षा

लातूर :– २५ डिसेंबर दिनी महाविहार धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर रामेगाव ता. जि. लातूर येथे सहाव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मातंग समाज चलो बुद्ध की और या अभियानांतर्गत डीएस नर्सिंगे यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यातील गोरख शिंदे, उज्वला शिंदे, ज्योती शिंदे, पी एस गायकवाड, पुष्पा सूर्यवंशी, स्वाती समुखराव, ज्योती कांबळे, आरती पुंडे अशा आठ मातंग समाजातील बंधू–भगिनींनी जाहीरपणे बौद्ध धम्माची दीक्षा ग्रहण केली.



बहुजन समाजातील लोकांनी वैचारिक प्रबोधन करून जुन्या चालीरीती कर्मकांड अंधश्रद्धा देवधर्म त्यागुन तथागत भगवान बुद्धाच्या समता स्वातंत्र्य बंधुत्व आणि न्याय या सामाजिक तथा समता प्रवाह असणाऱ्या तत्त्वज्ञानाचा अंगीकारस सदविवेक बुद्धीने जपान येथील बौद्ध भिक्खु जुन्सई तेरासावा व भिक्खु संघाच्या आणि हजारो जनसमुदायाच्या साक्षीने त्रिसरण पंचशील ग्रहण करून २२ प्रतिज्ञा म्हणत जाहीरपणे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. यावेळी धम्म परिषदेचे संयोजक भिक्खु पय्यानंद थेरो यांनी दीक्षार्तीना त्रिशरण पंचशील दिले. यावेळी धम्मदिक्षा दीक्षार्थींचे धम्मदीक्षा प्रमाणपत्र देऊन पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. तर संभाजीनगर येथील भन्ते प्रा. डॉ. एम.सत्यपाल महाथेरो यांनी २२ प्रतिज्ञा दिल्या. याप्रसंगी भंते डॉ. उपगुप्त महाथेरो, भन्ते धम्मसेवक महाथेरो, भन्ते महाविरो थेरो, भन्ते बोधिधम्मा, भंते बुध्दशिल,डॉ. जि. के. डोंगरगांवकर, लक्ष्मीकांत शिंदे, संजय राऊत, तुळशीराम घोडके, मंगल कांबळे, छगन घोडके, डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. देवदत्त सावंत हजारोंच्या संख्येने बहुत उपासक उपासिका उपस्थित होते.

सहाव्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात नांदेड रोड येथील डॉक्टर आंबेडकर चौक येथे बौद्धाचार्य केशव कांबळे यांच्या हस्ते धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करून भगवान बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रासहित भिकू संघ उपासक उपासिका यांची धम्म मिरवणुक संपन्न झाली. त्यानंतर दुपारच्या दुसऱ्या सत्रात धर्म परिषदेचे उद्घाटन जपान येथील भिक्खु जुन्सई तेरासावा यांचे हस्ते उदघाटन संपन्न झाले.

यावेळी राज्याचे क्रीडा युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, लातूर जिल्ह्याचे खा. सुधाकर शृंगारे, भाई नगराळे, राज्यकर उपायुक्त प्रदीप रणपिसे आणि विशेष रूपाने उपस्थित असलेले आंबेडकरी चळवळीचे नेते तथा रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष आ. प्रा. जोगेंद्र कवाडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी सर्वांची मनोगते संपन्न झाली. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# तेरे नाम म्हणत सलमान खानचे चाहते शेख बंधू तब्बल २४ वर्षापासून साजरा करतायत सलमान खानचा वाढदिवस.

औसा / आसिफ पटेल :– मैने प्यार किया मधून तरुणाईच्याच नव्हे तर रसिक प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या सलमान खान यांनी मागे वळून पहिलेच नाही. आजही त्यांच्या अभिनयचं गारुड रसिक प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतंय.






त्यात सलमान खान यांच्या सामाजिक उपक्रमानी भर घातलीय. म्हणूनच आज सलमान खान यांचा वाढदिवस त्यांचे चाहते मोठ्या जल्लोषात साजरा करतायत. सलमान खानच्या चाहत्यांनी त्यांच्यावर विविध माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव केलाय. मात्र लातूर जिल्ह्यातील औसा येथे खान बंधू सलमान खानचा चाहता असून ते गेल्या २४ वर्षांपासून सलमान खानचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी अतिशय उत्साहात साजरा करतात. ५८ किलो गुलाबजामून आणि वृक्षांची रोपे वाटप करून आतिषबाजी करत सलमान खानचा वाढदिवस अतिशय उत्साहात साजरा केलाय. केवळ मुजहीद शेखच नाही तर त्यांचा भाऊ मुजहीद शेख सुद्धा सलमान खानचा चाहता आहे. तेरे नाम चित्रपटापासून तर ते अधिकच चाहते बनले आहेत. पुढच्या वर्षी सलमान खानचा वाढदिवस साजरा करण्याचे २५ वर्ष असेल. तो वाढदिवस सलमान खान यांना भेटून साजरा करण्याचा मानसही शेख बंधूचा आहे. आता या शेख बंधूना उत्सुकता आहे ती वाढदिवसाच २५ वं वर्ष साजर करण्याची. आजही सलमान खानच्या चाहत्यामध्ये त्यांची क्रेझ असल्याचे यातून पाहायला मिळतेय.

# बौध्दिक संपदेच्या माध्यमातून भारताचा प्रभाव संपूर्ण जगावर कायम राहणार आहे – माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.२७–१२–२०२३ भारत हा कधीकाळी विश्वगुरू होता. तक्षशिला, नालंदा विद्यापीठाचा व येथील ऋषीमुनीच्या प्रभाव संपूर्ण जगावर होता. मोगल, इंग्रज, निजामाच्या पारतंत्र्यामध्ये या विचाराला बाजुला ठेवून कारकूनी बनविणारे शिक्षण दिले गेले. आजही जगात सर्वात हुशार भारतीय तरूण असल्याचे जागतिक सर्वेच्या माध्यमातून समोर आलेले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्रपती बराक ओबामा म्हणत मला भारतीय तरुणाची भीती वाटतो. जगामध्ये आज बुध्दिच्या जोरावर नवीन शोध लावले, त्यातून आर्थिक साम्राज्य निर्माण करणारे अमेरिकेतील बील गेट्स, स्टिव्ह जॉब, भारतीय राममूर्ती , मुकेश अंबानी यांची नावे होत. आज बुध्दिच्या जोरावर जगावर राज्य करणारे अनेकजण आहेत. त्यामुळे बौध्दिक संपदेचा प्रभाव संपूर्ण जगावर कायम राहणार आहे असे मौलिक विचार भाजपा नेते तथा जेएसपीएम शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त कले.यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद नॅशनल स्कूल काळेवाडी, रहाटणी येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन अरिन्दम् पॉवर ऑफ एज्युकेशन २०२३ च्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोपात बोलत होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात वीर बाल दिवस उत्साहात संपन्न

लातूर दि. २७ :–श्री गुरु गोविंद सिंह यांचे पुत्र साहिबजादे जोरावर सिंह व फतेह सिंह यांच्या शौर्याचे स्मरण म्हणून भारतात 'वीर बाल दिवस' साजरा केला जात आहे. साहिबजादे जोरावर सिंह आणि फतेह सिंह यांनी बालवयातच आपल्या धर्माच्या रक्षणार्थ आपल्या प्राणाची आहुती दिली आणि आपली धर्मनिष्ठा जपली. त्यामुळे त्यांच्या शौर्याचे स्मरण करण्यासाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आय. क्यु. ए. सी., जयंती महोत्सव समिती आणि इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. सर्वप्रथम साहिबजादे जोरावर सिंह व फतेह सिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, जयंती उत्सव समिती समन्वयक प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. नवनाथ सिंगापुरे, डॉ. मनोहर चपळे, डॉ. दीपक चाटे, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे, विनायक लोमटे, बालाजी डावकरे, भीमाशंकर सुगरे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. नामदेव बेंदरगे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा धोंडीबा भुरे यांनी केले तर आभार डॉ रत्नाकर बेडगे यांनी मानले



# रेणापूर येथील मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी खाजगी इमारत भाडेतत्वावर घेण्यात येणार

लातूर, दि. २७ (जिमाका) : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संचलित रेणापूर येथील मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी खाजगी इमारत भाडे तत्वावर घ्यावयाची आहे. तरी रेणापूर नगरपरिषद हद्दीतील इमारत मालकांनी आठ दिवसाच्या आत रेणापूर येथील मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वसतिगृहासाठी १०० विद्यार्थ्यांची निवासाची सोय, पुरेशे बाथरुम, रुम्स, टायलेट्स, २४ तास मुबलक पाणी, हॉल्स, किचन, विद्युत व्यवस्था, पार्किंग अशी व्यवस्था असणारी सर्व अत्यावश्यक सोयी सुविधायुक्त इमारत आवश्यक आहे. अशी इमारत असल्यास इमारतीमधील उपलब्ध सोयी सुविधांची माहिती, इमारतीचे फोटो, इमारत मालकी हक्काबाबतची कागदपत्रासह इमारत भाडेतत्वावर देणे संबंधित प्रस्ताव आठ दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत गृहपाल, मुलांचे शासकीय वसतिगृह, रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर या कार्यालयास सादर करावा, असे आवाहन रेणापूर येथील मुलांचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल भुसे वाय. बी. यांनी केले आहे.

# सुभेदार रामजी नगर येथे नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र (आयुष्मान आरोग्य मंदिर ) सुरुवात

लातूर :– शहरातील नागरिकांना त्यांच्या परिसरात आरोग्य सुविधा मिळण्यासाठी महानगरपालिकेतर्फे १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत उपलब्ध जागेमध्ये मनपा मार्फत नागरी दवाखाने चालू करण्यात येत आहेत .

या अंतर्गत शहरातीलसुभेदार रामजी नगर,परिसरात मनपाच्या वतीने नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र(आयुष्मान आरोग्य मंदिर) चालू करण्यात आले .दवाखान्याचे उदघाटन महानगरपालिकेचे अति आयुक्त श्री शिवाजी गवळी उपायुक्त श्री.रावसाहेब कोळगणे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळीलेखाधिकारी श्री.समद शेख व आरोग्य अधिकारी डॉ.महेश पाटील ,शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.रामेश्वर कलवले,वैद्यकीय अधिकारी डॉ.अशपाक शेख ,एएनएम श्रीमती जांगठे महादेवी व आशा कर्मचारीउपस्थित होते.यावेळी प्रभागातील माजी नगर सेविका व परीसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



या दवाखान्यामुळे सुभेदार रामजी नगर, शंभू नगर,अजिंठा नगर,श्री स्वामी समर्थ नगर परीसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा त्यांच्या परिसरातच उपलब्ध होणार आहे. सदरील दवाखाना सुट्टीचे दिवस वगळून दररोज सकाळी ८.०० ते दुपारी २.०० या वेळेत चालू राहणार आहे.

# भीषण रस्ता अपघातात ५ जणांचा मृत्यू

हैदराबाद : आंध्र प्रदेशातील मुम्मीदिवरम मतदारसंघातील वायएसआर काँग्रेस पक्षाचे आमदार पोनडा वेंकट सतीश कुमार यांच्या पाच नातेवाईकांचा अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या अपघातात मृत्यू झाला. २६ डिसेंबर रोजी हा अपघात झाला. मारले गेलेले लोक दुसऱ्या नातेवाईकाच्या घरी गेले होते आणि सकाळी प्राणिसंग्रहालयाला भेट देण्यासाठी गेले होते. घरी परतत असताना त्यांच्या वाहनाला पिकअप ट्रकने धडक दिली.पिकअप चुकीच्या दिशेने जात असल्याचे प्राथमिक अहवालात दिसून आले आहे. या घटनेत एक जण लोकेश चमत्कारिकरित्या बचावला. आमदारांचे काका पी नागेश्वर राव, सीता महालक्ष्मी, नवीना, कृतिक आणि निशिता अशी मृतांची नावे आहेत. अन्य सदस्याच्या नावाची माहिती मिळालेली नाही.मीडिया रिपोर्ट्सनुसार, जखमींना विमानाने हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. घटनेची माहिती देताना आमदार सतीश कुमार म्हणाले की, माझे काका नातेवाईकाच्या घरी ख्रिसमस साजरा करत होते. २६ डिसेंबर रोजी ते सकाळी प्राणीसंग्रहालयात गेले आणि दुपारी ४ वाजता (स्थानिक वेळेनुसार) परतले. त्याच्या कारला ट्रकने धडक दिली, ट्रकची चूक असल्याचे स्थानिक पोलिसांनी सांगितले.

# भाजयुमोच्या प्रदेश सचिवपदी ऋषिकेश कराड यांची नियुक्ती

लातूर दि.२७ :– भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव पदी लातूर ग्रामीण मधील भाजपाचे युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांची भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी नुकतीच नियुक्ती केली आहे. या निवडीबद्दल ऋषिकेश कराड यांचे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघासह जिल्हाभरातील अनेकांनी अभिनंदन केले आहे.



गेल्या काही दिवसापासून भाजपाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊन कार्यरत असणारे भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांचा मोठा जनसंपर्क आहे. संघटन कौशल्य, कर्तुत्व आणि वकृत्व असल्याने सामाजिक, राजकीय व इतर कार्यातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांना भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सचिव पदाची जबाबदारी २६ डिसेंबर २०२३ मंगळवार रोजी एका पत्रकान्वये दिली आहे. देशाची पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन राज्याचे लोकप्रिय नेते तथा उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आपली भाजयुमो प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असून भाजपाला ताकद मिळून देण्यासह पक्षाची ध्येय धोरणे विचार तथा भाजपाचे काम तळागाळातील सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम कराल अशी अपेक्षा नियुक्ती पत्रातून राहुल लोणीकर यांनी व्यक्त केली आहे.

भाजयुमोच्या माध्यमातून प्रदेश स्तरावर काम करण्याची जबाबदारी दिल्याबद्दल ऋषिकेश कराड यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, पालकमंत्री गिरीषजी महाजन, माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, जिल्ह्याचे खासदार सुधाकर शृंगारे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार यांच्यासह अनेक मान्यवर नेत्यांचे ऋषिकेश कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल ऋषिकेश कराड यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE